प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर यांच्या अधिपत्याखालील कलाकार यांना मुख्य कलाकार म्हणून दर्जोन्नत्ती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन आदेश क्रमांक ०५.२५/प्र.क्र.१२३/वने-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २३ जुलै,२०२६

संदर्भ:

१. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक एमएफएस-२०१७/प्र.क्र.७७/फ-८, दि. १३.०९.२०१९

२. समक्रमांकित शासन निर्णय दि.२३.०७.२०२६

प्रस्तावना:-

वन विभागातील पदांचा सुधारीत आकृतीबंध संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आला आहे. त्यामध्ये वन विभागाच्या प्रचार व प्रसिद्धी कार्यासाठी अधिसूचित असलेले चित्रकार/ कलाकार(Artist) (वेतनश्रेणी एस-१०: २९२००-९२३००) हे पद मृत संवर्ग म्हणून घोषीत केलेले आहे. सदरहू संवर्गामध्ये आजमितीस १ पद कार्यरत आहे. चित्रकार/ कलाकार हे पद मृत संवर्ग घोषीत केलेले असल्याने तसेच, वन विभागाच्या प्रचार व प्रसिद्धी कार्यासाठी, पर्यावरण जनजागृती, प्रसार माध्यमांशी समन्वय ठेवून नकारात्मक बातम्यांचे खंडन तसेच प्रभावी ऑडिओ-व्हिडिओ संदेश निर्मितीसाठी मुख्यालय स्तरावर एका तज्ज्ञ पदाची आवश्यकता असल्याने प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर या कार्यालयात "मुख्य कलाकार" (Chief Artist) (वेतनश्रेणी एस -१५: ४१,८०० - १,३२,३००) हे नवीन पद संदर्भाधीन क्र. २ येथील शासन निर्णयान्वये निर्माण करण्यात आले आहे. तसेच, सदरहू पद निर्मितीमुळे सध्या अस्तित्वात असलेले चित्रकार/ कलाकार हे पद व्यपगत झाले आहे. त्यामुळे, चित्रकार/ कलाकार (Artist) (वेतनश्रेणी एस-१०: २९२००-९२३००) पदावर कार्यरत असलेल्या कर्मचारी/अधिकाऱ्याची "मुख्य कलाकार" या पदावर दर्जोन्नत्ती देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख),म. रा. नागपूर यांच्या कार्यालयातील चित्रकार/ कलाकार (Artist) (वेतनश्रेणी-एस-१०: २९२००-९२३००) या पदावर कार्यरत असलेले श्री. राजेश मुरलीधर मेश्राम यांना मुख्य कलाकार (Chief Artist) (वेतनश्रेणी एस-१५ : रु. ४१,८०० - १,३२,३००) या पदावर सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने दर्जोन्नत्ती देण्यात येत आहे.

२.   सदरहू आदेश तात्काळ अंमलात येतील. सध्या चित्रकार/ कलाकार पदावर कार्यरत असलेल्या श्री. मेश्राम हे नवनिर्मित मुख्य कलाकार (Chief Artist) या पदावर रुजू झाल्याबाबतचा अहवाल शासनास सत्वर सादर करावा.

३.   "मुख्य कलाकार, गट-ब" या पदावरील श्री. मेश्राम यांची वेतननिश्चीती प्रचलीत तरतूदीनुसार करण्यात येईल.

४.   सदर शासन आदेश, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२६०७२३१३१११९९९४० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SAPKAL PRASHANT PRALHAD

Digitally signed by SAPKAL PRASHANT PRALHAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=C2EC242CAEF55E035A22245B60A2752C90753E697F5E56596B3524D34280A891, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9548CB33E24729A59B6A5C72EE905604BA53420C8EACFD34E9E8C2460B8AA409, cn=SAPKAL PRASHANT PRALHAD
Date: 2026.07.23 13:12:38 +05'30'

(प्रशांत सपकळ)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत सादर :

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य,नागपूर.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती तंत्रज्ञान व धोरण), महाराष्ट्र राज्य, नागपूर
७) मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
८) महालेखापाल,महाराष्ट्र-१/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र -१/२, मुंबई/ नागपूर
९) अपर मुख्य सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक
१०) संबंधित अधिकारी (प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), म.रा.नागपूर यांचे मार्फत)
११) निवड नस्ती (वने-८ कार्यासन)